दै. गोदातीर दि. 23.02.2022

# मोबाईल टॉवरवरील बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीला एलसीबीने केले जेरबंद

- अर्धापूर तालुक्यात टॉवरच्या बॅटऱ्यांवर मारायचे डल्ले
- बॅटऱ्यांसह एक स्कॉर्पिओ गाडीही जप्त

**नांदेड** - मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या व अन्य किंमती साहित्य चोरणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली आहे. चोरट्यांकडून पोलिसांनी बॅटऱ्या, एक स्कॉर्पिओ गाडी असा साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अर्धापूर परिसरातील मोबाईल टॉवर या चोरट्यांचे प्रामुख्याने लक्ष्य असायचे.

दिनांक २१ फेब्रुवारी रोजी राजेश निवृतीराव लोणे यांचे शेतातील इंडज कंपनीचे टॉवर असलेल्या ठिकाणी बॅटरी बँकमधील आमर राजा कंपनीच्या २४ बॅटऱ्या (किंमत एक लाख ५७ हजार रुपये) चोरीस गेल्या. या प्रकरणी पोलीस ठाणे अर्धापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन अटक करण्याबाबतच्या सुंचना देऊन पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी पोलीस निरीक्षक स्थागुशा यांना आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी स्था. गु. शा. येथील अधिकारी व अमलदार यांचे पथक तयार केले होते.



दिनांक २१ फेब्रुवारी रोजी टॉवरच्या बॅटऱ्या चोरी करणारा चोरटा लहान येथे असल्याबाबत गुप्त माहिती द्वारकादास चिखलीकर यांना मिळाली. त्यांनी स्थागुशाचे अधिकारी व अमलदार यांना इसमास पकडून चौकशी करण्यासाठी रवाना केले. स्थागुशाच्या पथकाने मौजे लहान येथील खंडू रामराव बाभुळकर (वय ३२ वर्षे) रा. लहान ता. अर्धापूर, गणेश रामराव बाभुळकर (वय २७ वर्षे) रा. लहान ता. अर्धापूर, संदीप सिद्धोजी वानोळे (वय २४ वर्षे) रा. लहान ता. अर्धापूर, नवनाथा तानाजी मोहकर (वय ३२ वर्षे) रा. चेनापूर ता. अर्धापूर यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली. तेव्हा त्यांनी दि. २१ फेब्रुवारी रोजी राजेश लोणे यांचे शेतातील इंडज कंपनीचे टॉवर असलेल्या ठिकाणी बॅटरी बँकमधील अमर राजा कंपनीच्या २४ बॅटऱ्या (किंमत १,५७,०००/- रुपये) स्कॉर्पीओ गाडी क्रमांक (एमएच २६ एन ४९४४) मध्ये टाकून चोरून नेल्याची कबुली दिली. तसेच मोहकर याच्या शेतातील आखाड्यावर त्या लपवून ठेवल्याचे सांगितले. त्यावरून स्थागुशाच्या पथकाने त्यांना ताब्यात घेवुन गुन्ह्यातील अमर राजा कंपनीच्या बॅटऱ्या व गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पीओ गाडी क्रमांक एम एच २६ एन ४९४४ किंमती ४ लाख रुपये असा एकूण ५,५७,०००/- रुपयांचा माल दोन पंचांसमक्ष जप्त केला. गुन्ह्याचे पुढील तपासकामी मुद्देमाल व आरोपींना पोलीस ठाणे अर्धापूर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपींकडून अशाचप्रकारचे आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी सपोनि पांडुरंग भारती, पोउपनि आशिष बोराटे, पोहेकॉ गंगाधर कदम, पो. ना. संजीव जिंकलवाड, विठ्ठल शेळके, पोकॉ विलास कदम, चालक शंकर केंद्रे यांनी पार पाडली आहे.

दै. गोदातीर दि. 23.02.2022

# ग्रामीण पोलीस स्टेशनने पाच लाख रुपये व मोबाईल केला परत

**नवीन नांदेड** - घरातून नगदी पाच लाखांपेक्षा अधक रक्कम घेऊन निघून गेलेल्या बालकाला पकडून त्याच्याकडील रक्कम व मोबाईल ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्यांनी ताब्यात घेऊन संबंधितांना ५ लाख रुपये व मोबाईल परत केला.



घरातील मंडळी लग्नासाठी बाहेर गावी गेल्याचे पाहून अल्पवयीन बालकाने घरातील रक्कम घेऊन कोणासही काही न सांगता मित्रासोबत निघून गेला.त्या दोघांचा शोध सायबर सेलच्या साह्याने करून मुंबई येथून त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या बालकांकडून पाच लाख रुपये व मोबाईल जप्त करण्यात आला होता. अटी व शर्तीवर तो ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड व उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांनी संबंधितास २२ फेब्रुवारी रोजी परत केला आहे.

या प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण गु.र.नं. ९६/२०२२ कलम ३६३ भा.द.वि. कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या तक्रारीत म्हटले की, अल्पवयीन बालक पियुष पिता शंकर गोरे, वय १५ वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा. जुन्ना कौठा, ता.जि. नांदेड हा दि. १७ फेब्रुवारी रोजी आम्ही लग्नासाठी बाहेर गावी कोणासही काही न सांगता निघून गेला. तेव्हा आम्ही मुलाचा शोध घेतला. तो मिळून न आल्याने दिनांक १८ फेब्रुवारी रोजी पो. स्टे. नांदेड ग्रामीण येथे हजर होऊन तक्रार दिल्याने माझे तक्रारीवरून गुन्हा नोंद झाला आहे. मुलाच्या सोबतच्या मित्राच्या मोबाईलचे लोकेशन पोलिसांनी सायबर सेल नांदेड येथून काढले असता लोकेशन मालाड बोरीवली मुंबई येथील येत असल्याने आम्ही व पोलीस दि. १९ रोजी मुंबई येथे जाऊन मुलांना तेथील सायबर पोलिसांचे मदतीने ताब्यात घेतले. माझा मुलगा पियुष याने घरून

१०,२०००/- रुपयांचा व त्याचेजवळ नगदी-५ लाख रुपये मिळून आले. ते पोलिसांनी माझे व पंचासमक्ष मुंबई येथे जप्त केले होते. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये अर्ज केल्यानंतर पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी पैसे व मोबाईल ने मी कोणास विक्री करणार नाही, कोणाकडे गहाण ठेवणार नाही तसेच सदर फेरबदल अगर हस्तांतरण करणार नाही. मा.कोर्टास ज्या ज्या वेळी गरज पडेल त्या त्या वेळी मी पैसे व मोबाईल मा. न्यायालयात हजर ठेवीन, या अटी व शर्तीवर मला जप्त पाच लाख व एक मोबाईल परत केला आहे. असे